Academy for Administrative Careers

**मुंबई विदयापीठात स्पर्धापरीक्षा प्रशिक्षण व मार्गदर्शन प्रवेश अर्ज स्विकारण्यास मुदत वाढ**

मुंबई विद्यापीठाच्या प्रशासकीय व्यवस्थापन प्रशिक्षण अकादमीतर्फे घेतल्या जाणा या परीक्षांचे अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ केली आहे. यासाठी प्रवेश अर्ज दिनांक २५ जुलैपर्यंत स्वीकारले जातील. या परीक्षेसाठी नाममात्र शुल्क ५०० रू. व एक अलिकडचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र आवश्यक आहे. प्रवेश परीक्षा ३ ऑगस्ट रोजी घेण्यात येणार आहे. या परीक्षेनंतर पात्र उमेदवारांची यादी लावण्यात येईल.यानंतर २०१५ च्या पूर्व परीक्षेच्या सत्रासाठी (म्हणजेच क्लासेससाठी) शैक्षणिक शुल्क ३०००रू. आहे. तसेच जे विद्यार्थी राखीव आहेत त्यांना शुल्क १५००रू. आहे.

याकरीता साधारणत: एकूण १०० जागा उपलब्ध आहेत. इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे विद्यापीठाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

प्रवेश अर्ज देण्याची वेळ स. १०.३० ते ५.३० आहे. संपर्कासाठी पत्ता: डॉ. अंबादास जाधव, प्रभारी संचालक, प्रशासकीय व्यवसाय अकादमी, रूम नं. ४, जे. पी. नाईक भवन, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई.

दूरध्वनी क्र. ०२२/२६५४३५४७ – २६५३०२०८ वर संपर्क साधावा.

डॉ. अंबादास जाधव
प्राध्यापक प्रभारी संचालक
प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण अकादमी